महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
१५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक- ०२२-२२७९३४४७ ई-मेल- navnath.pokale@nic.in

**पूरवणी मागण्या / ई-मेलद्वारे**

क्रमांक : बीजीएम-१०.२४/प्र.क्र.५१/अर्थ-१/२०२३. दिनांक :०९ मे, २०२४.

प्रति,

१) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे,
२) सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा विभाग (महामंडळांकडील मुख्य अभियंते वगळून)
३) उप सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) सर्व उप सचिव / अधीक्षक अभियंते, जलसंपदा विभाग (महामंडळांकडील अधीक्षक अभियंता वगळून)
५) सर्व अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणे,
६) अवर सचिव (गृव्य), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विषय** : सन २०२४-२५ मधील खर्चाच्या पूरक मागण्या -जून, २०२४ चे पावसाळी अधिवेशन.
**संदर्भ** : वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र : पूरक-२०२४/प्र.क्र. ४४/अर्थ-३, दि.०७ मे, २०२४.

महोदय,

वित्त विभागाचे संदर्भाधीन परिपत्रक कृपया पहावे. त्यानुसार वित्त विभागाच्या परिपत्राकातील परि.क्र.२ मधील नमूद केलेल्या क्र.१ ते ५ प्रयोजनांमधील अत्यावश्यक असेल अशा प्रयोजनांसाठी जून, २०२४ च्या विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सादर करावयाच्या **कार्यक्रमांवरील** खर्चाच्या पूरक मागण्यांचे परिपूर्ण प्रस्ताव सहपत्रातील माहितीसह **दि.१३.०५.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत** (हार्ड व सॉफ्ट कॉपीमध्ये) विभागातील **आपल्या विषयाशी संबंधित कार्यासनास** सादर करावेत.

तसेच, **अनिवार्य** खर्चातील अत्यावश्यक असलेल्या प्रयोजनासाठीच्या खर्चाच्या पूरक मागण्यांचे परिपूर्ण प्रस्ताव अर्थ कार्यासनास **दि.१३.०५.२०२४ रोजी सायंकाळी ५.००** पर्यंत सादर करण्यात यावेत.

२. विभागातील संबंधित कार्यासनांकडे अत्यावश्यक असलेल्या प्रयोजनांसाठीच्या खर्चासाठीचे प्राप्त झालेले पूरक मागण्यांचे परिपूर्ण प्रस्ताव संबंधित कार्यासनांनी तपासून सदर प्रस्तावांना सचिव स्तरावर मंजूरी घ्यावी. त्यानंतर सदर नस्ती अर्थ कार्यासनास दि.१५.०५.२०२४ रोजी दुपारी ३.०० पर्यंत पूरक मागणी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर नोंदविण्यासाठी सादर करावी.

३. वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्राकातील परि.क्र.२ मधील नमूद क्र.१ ते ५ प्रयोजनांव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी पूरक मागण्या सादर केल्यास सदरचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी. विहित दिनांकानंतर प्राप् होणाऱ्या पूरक मागण्यांच्या प्रस्तावांवर कार्यवाहोऊ न शकल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील.

आपला,

(नवनाथ पोकळे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत- १) सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) अर्थ-१ कार्यासन संग्रहार्थ.